IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वरांचे समाजवादी आणि मानवतावादी विचार

[1]Prof. Shinde Kondiba Sidram, [2]Prof. Dr. Pawar Sajjan Uddhav

[1]Assistant Professor, & Head. Department of History, D.P. Bhosale College, Koregaon

[2]Assistant Professor, Department of History, Shankarrao Mohite Mahavidyalay, Akluj, Tal. Malshiras

**Article Info**

***Article History:***

Received: 20th February 2026

Accepted: 01st March 2026

Published: 07th March 2026

***Keywords:***

*महात्मा, समाज, श्रम, प्रतिष्ठा, समाजसुधारक, धर्म, जात, गरीब, श्रीमंत, विचार, मानवतावाद*

**ABSTRACT**

महात्मा बसवेश्वर हे समता बंधुता आणि श्रमाला प्रतिष्ठा देणारे थोर समाजसुधारक होते. त्यांनी जातीयता लिंग भेद आणि अंधश्रद्धेवर कडाडून टीका करत अनुभव मंटपद्वारे लोकशाही मूल्यांची पायाभरणी केली. कायकवे कैलास  हा त्यांचा विचार आजही सामाजिक-आर्थिक समतेचा मुख्य आधार आहे. महात्मा बसवेश्वरांनी जाती-पातीचे उच्चाटन करून लिंगायत धर्माच्या माध्यमातून सर्वांना समानतेची वागणूक दिली जे १२ व्या शतकातील समाज सुधारणा आहे. महात्मा बसवेश्वरांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. कोणताही व्यवसाय लहान किंवा मोठा नसून प्रामाणिक कष्ट हाच खरा परमेश्वर आहे असे त्यांनी सांगितले. स्त्री-पुरुष गरीब-श्रीमंत आणि सर्व जातीच्या लोकांना एकत्र येऊन आध्यात्मिक व सामाजिक विषयांवर चर्चा करण्यासाठी त्यांनी अनुभव मंटप स्थापन केला जे जगातील पहिले संसद मानले जाते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Shinde, Kondiba Sidram, & Pawar, Sajjan Uddhav.** (2025). महात्मा बसवेश्वरांचे समाजवादी आणि मानवतावादी विचार. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **472–475.**

**प्रस्तावना:**

पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना आध्यात्मिक आणि सामाजिक जीवनात समान हक्क दिले. ईश्वर इतरत्र कुठेही नसून तो माणसात आहे ही शिकवण दिली. त्यांनी मानवी मूल्यांना धर्मापेक्षा जास्त महत्त्व दिले. त्यांनी संस्कृत ऐवजी सर्वसामान्यांच्या भाषेत वचने लिहून सामाजिक व धार्मिक सुधारणांचा प्रसार केला. जात नाकारून त्यांनी आंतरजातीय विवाहांचे आणि सर्वांनी एकत्र मिळून जेवण करण्याचे समर्थन केले. थोडक्यात बसवेश्वरांचे विचार हे विषमतेविरुद्ध बंड आणि मानवाच्या प्रतिष्ठापनासाठी केलेले कार्य होते. बसवेश्वरांच्या कार्याचा समाजावर सकारात्मक परिणाम झाला. कर्नाटकात महात्मा बसवेश्वरांनी लिंगायत विचारधारेचा प्रसार केला. बसवेश्वरांनी श्रमप्रतिष्ठेला महत्त्व सांगितले.आपल्या चळवळीमध्ये स्त्रियांनाही सहभागी करून घेतले. त्यांनी आपली शिकवण कन्नड या लोकभाषेमध्ये वचन साहित्याच्या माध्यमातून दिली. महात्मा बसवेश्वर हे एक महान समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि वीरशैव लिंगायत धर्माचे प्रणेते होते, ज्यांनी कर्नाटक राज्यात सामाजिक समानता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि जातीभेदाविरुद्ध क्रांती घडवून आणली; त्यांनी अनुभव मंडप स्थापन करून सर्व स्तरातील लोकांना एकत्र आणले आणि वचन साहित्य या माध्यमातून क्रांतिकारी विचार मांडले, ज्यामुळे त्यांना सामाजिक समतेचे आद्य प्रवर्तक म्हटले जाते. ११३१ मध्ये विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी येथे मादिराज आणि मादलंबिका यांच्या पोटी झाला. बसवकल्याण येथे त्यांचे कार्यक्षेत्र होते.

**अभ्यासाच्या समस्या:**

सध्याच्या परिस्थितीमध्ये समाजामध्ये निर्माण झालेली आर्थिक सामाजिक राजकीय धार्मिक आणि सांस्कृतिक विषमता या दृष्टिकोनातून सदरचे संशोधन महत्त्वपूर्ण आहे. कारण समाजातील समाजवादी आणि मानवतावादी विचार मध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे त्यामुळे समस्या निर्माण होत आहेत. या सर्व प्रकारच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी समाजातील अनेक विचारवंता पैकी महात्मा बसवेश्वर यांनी मांडलेल्या समाजवादी आणि मानवतावादी विचारांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने सदरचे संशोधन महत्वाचे आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्टे:**

महात्मा बसवेश्वर यांच्या समाजवादी आणि मानवतावादी विचारांचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा मुख्य उद्देश असून काही विशिष्ट उद्दिष्टे संशोधकाने खालील प्रमाणे दिलेली आहेत.

१. महात्मा बसवेश्वर यांच्या समाजवादी विचारांचा अभ्यास करणे.

२. महात्मा बसवेश्वर यांच्या मानवतावादी विचारांचा अभ्यास करणे.

३. महात्मा बसवेश्वर यांच्या समाजवादी आणि मानवतावादी विचारावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाचे महत्त्व:**

सध्याच्या आधुनिक युगामध्ये महात्मा बसवेश्वरांचे समाजवादी आणि मानवतावादी विचाराचे महत्त्व जादाचे आहे. कारण सध्याची तरुण पिढी ही व्यसनाधीन आणि चुकीच्या विचाराने समाजामध्ये वावरत आहे. समाजातील चुकीचे विचार आणि तरुणांना योग्य विचार देऊन त्यांना भविष्यकाळासाठी समाजवादी आणि मानवतावादी विचारधारा निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे. सदरची संशोधन हे समाजातील अनेक व्यक्ती राजकारण समाजकारण संशोधक विद्यार्थी संस्था अर्थकारण समाजव्यवस्था इत्यादी घटकासाठी महत्त्वाचे आहे.

**अभ्यासाची व्याप्ती:**

महात्मा बसवेश्वर यांनी समाजवादी आणि मानवतावादी विचाराची मांडणी अत्यंत विचारशील पद्धतीने केलेली असून भविष्यकाळाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे विचार मांडले आहेत. महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची व्याप्ती ही संपूर्ण विश्व असली तरीही यामध्ये मानवतावादी विचार महत्त्वाची भूमिका दर्शवतो आहे.

**अभ्यासाची मर्यादा:**

समाजवादी आणि मानवतावादी विचारातून नाविन्यपूर्ण विचारधारा निर्माण करणे आणि त्या दृष्टीने विकसित भारत करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सदरचे संशोधन हे समाजातील महात्मा बसवेश्वर या एका व्यक्तीच्या समाजवादी आणि

मानवतावादी विचाराशी संबंधित आहे असा विचार यामध्ये मांडलेला आहे. परंतु समाजवादी आणि मानवतावादी विचारधारा निर्माण करण्यासाठी समाजामध्ये विविध व्यक्तींनी प्रयत्न केले आहेत परंतु सदरच्या संशोधनामध्ये फक्त एका व्यक्तीच्या मानवतावादी आणि समाजवादी विचाराचा यामध्ये समावेश केला आहे ही या संशोधनाची एक मर्यादा आहे.

**अभ्यासाचा कालावधी:**

समाजवादी आणि मानवतावादी महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकांनी 19 व्या शतकातील आणि 20 व्या शतकातील तसेच 21 व्या शतकातीलही दूरदृष्टीचा अभ्यास केला आहे. सध्याच्या आधुनिक युगामध्ये विचारशील प्रत्येक व्यक्ती निर्माण होणे गरजेचे आहे याचा मानवतावादी विचारातून महात्मा बसवेश्वर यांनी विचारांची मांडणी केली आहे.

**संशोधन पद्धती:**

सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मानवतावादी विचार कमी होऊ लागला आहे आणि नवनवीन तांत्रिक विचार रूढ होऊ लागले आहेत. परंतु सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग असले तरीही या युगामध्ये समाजातील समता बंधुता प्रेम आपुलकी आणि एकमेकाविषयी असलेला मानवतावाद भविष्यकाळाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. सदरचे संशोधन करीत असताना संशोधकांनी अनेक प्रकारच्या दुय्यम संशोधनांचा वापर केला आहे. यामध्ये रिसर्च पेपर आर्टिकल्स जर्नल्स न्यूज पेपर ऑडिओ व्हिडिओ संदर्भ पुस्तके क्रमिक पुस्तके वार्षिक अहवाल प्रबंध इत्यादींचा समावेश होतो.

**संशोधन पद्धत:**

महात्मा बसवेश्वर यांच्या समाजवादी आणि मानवतावादी विचारांचा अभ्यास सदरच्या संशोधनामध्ये संशोधकांनी केला आहे. मानवतावादी विचार समाजातील सर्वसमावेशक दृष्टिकोन आणि समानतेची वागणूक देणारा आहे. सदरचे संशोधन करीत असताना वर्णनात्मक विश्लेषण पद्धतीचा वापर करून संशोधन केले आहे.

**विश्लेषण आणि चर्चा:**

भारतातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था यामुळे समाजात निर्माण झालेल्या विविध समस्या मानवाला माणूस म्हणून न लेखणे समाजात आपआपसात भेदभाव करून एका विशिष्ट जातीला महत्त्व देणे. यामुळे भारतात इंग्रजी सत्तेसोबतच अंतर्गत गुलामी सुद्धा अस्तित्त्वात होती. महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात जे अनुभवले. तसेच त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील विचार आणि कार्याच्या आधारे त्यातील साम्य व भेद तुलना करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**बसवेश्वरांचे समाजवादी विचार:**

बसवेश्वरांनी सर्व जाती, धर्म आणि लिंगांच्या लोकांसाठी एक खुले व्यासपीठ स्थापन केले, जिथे आध्यात्मिक आणि सामाजिक विषयांवर चर्चा होत असे. वर्णभेद, लिंगभेद आणि जातीभेद यांसारख्या सामाजिक विषमतेच्या विरोधात त्यांनी आवाज उठवला. त्यांनी इष्टलिंग सर्वांना दिले, जे भक्तीचे प्रतीक होते आणि लिंगायत धर्माची स्थापना केली. त्यांनी कन्नड भाषेत वचन या स्वरूपात क्रांतिकारी विचार आणि तत्त्वज्ञान मांडले, जे आजही प्रेरणादायी आहे. स्त्रियांना समान अधिकार दिले आणि त्यांना समाजात सन्मान मिळवून दिला. त्यांनी श्रमाची प्रतिष्ठा वाढवली आणि सर्व व्यवसायांना समान मानले. त्यांना बसवण्णा बसवराज या नावांनीही ओळखले जाते. त्यांच्या सन्मानार्थ भारताच्या संसदेत पुतळा उभारण्यात आला आहे. त्यांच्या कार्यामुळे बाराव्या शतकात समाजात मोठी क्रांती झाली, जी आजही प्रासंगिक आहे. त्यांनी कठोर जातिव्यवस्थेला नकार दिला आणि सर्वांना आध्यात्मिक आणि सामाजिक जीवन जगण्याची समान संधी मिळावी या कल्पनेला प्रोत्साहन दिले . त्यांनी लिंगायत धर्माची स्थापना केली, ज्यामध्ये एकेश्वरवाद आणि सर्वोच्च देवता म्हणून शिवाची उपासना यावर भर देण्यात आला.

**महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक कार्य:**

समाजातील अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा जातीयता, अस्पृश्यता दूर करण्यासाठी महात्मा बसवेश्वर यांनी महान कार्य केलेले असून माणसामाणसामध्ये भेद निर्माण करणाऱ्या चातुवर्ण व्यवस्थेमध्ये समाज शोषित आणि पिढित होता. अशा समाजाला यांनी राजकीय व्यवस्थेच्या माध्यमातून समताधिष्ठित समाजाचा पाया महात्मा बसवेश्वर यांनी घातला. तत्कालीन राजकिय व्यवस्थेत लढाया करणे, साम्राज्य विस्तार करणे, स्वहिताबरोबर आपल्या निकटवर्तीयांचे हित साधने हा प्रमुख उदेश होता. १२ व्या शतकात

महात्मा बसवेश्वर यानी आपल्या विचार आणि कार्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या लोकशाही मुल्यांचे समाजात बीजारोपण केले. त्यातुन सक्षम, संस्कारीत, सुद्रढा मानवकेंद्रित समाजाची निर्मिती झाली.

**महात्मा बसवेश्वर आणि राजकिय सत्ता:**

महात्मा बसवेश्वर महापुरुषांने राजकिय सत्ता हे समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. महात्मा बसवेश्वर यांनी प्रतिकुल परिस्थितीमध्ये आपले राजकिय वलय निर्माण केले होते. मिळालेली सत्ता ही स्वहितासाठी नसून ही लोकांच्या कल्याणासाठी असते या विचारातून त्यांनी कृतिशिलपणे कार्य केले. सत्तेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन परिवर्तन घडवून आणता येते हे जगाला दाखवून दिले.

**महात्मा बसवेश्वर आणि विचार प्रासंगिकता:**

कोणत्याही महापुरुषांचे विचार स्थळ, काळ सापेक्ष असतात. जात, धर्म, भाषा, लिंग, प्रांत यांच्या पलिकडे जावून मानवी कल्याण हा त्यांच्या विचारांचा मुख्य धागा असतो. त्यमूळे त्यांनी दिलेल्या विचारांची प्रासंगिकता अबाधित आहे. ती कधिही नष्ट होणार नाही. महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या विचार आणि कार्यातून नेहमीच समाजाला प्रेरणा दिलेली आहे. आजच्या आधुनिक समाजात जात, धर्म, लिंग, भाषा, प्रांत हा भेदभाव पाळला जातो, सत्तेचा गैरवापर केला जातो, अशा अज्ञानी अंधश्रधाळू, भ्रष्टाचारी, सत्तांध समाजाला दोन्ही महापुरुषांनी राजकिय व्यवस्थेतून दिलेल्या सामाजिक समतेची, लोकशाही मुल्यांची आणि कृतिशिलतेची अत्यंत गरज आहे.

**निष्कर्ष:**

भारतासारख्या विकसनशील आणि मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारलेल्या लोकशाही राष्ट्रांमध्ये समाजवादी आणि मानवतावादी विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. भारतामध्ये अनेक विचारवंत होऊन गेले आहेत परंतु महात्मा बसवेश्वर यांनी मांडलेला विचार हा सध्याच्या तरुण पिढीसाठी एक नाविन्यपूर्ण विचार आहे. समाजवादी आणि मानवतावादी विचारातून सध्याची पिढी घडावी आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला राजकारण सामाजीकरण अर्थकारण धर्म वंश जात परंपरा यातील ज्ञान प्राप्त व्हावे. मानवतावादी विचारून निर्माण झालेली पिढी भविष्यकाळाच्या विकसित राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे कारण समाज हा समाजवादी म्हणजेच प्रत्येक समाजामध्ये समानता निर्माण झाली पाहिजे या दृष्टीने विचार करत असतो. म्हणून सदरचे संशोधन हे संशोधक विद्यार्थी प्राध्यापक शिक्षण संस्था सामाजिक संस्था राजकारण समाजकारण अर्थकारण जातीभेद विषमता या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ:**

1. Harshitha (2025), Shri Basaweshwara on the Ideology of Social Equality and Justice, pp. 31-39.
2. Jayanth (2024), Basaveshwara’s Legacy: The Intersection of Labor Dignity and Democratic Thought, pp. 42-49.
3. Chitmath (2017), Human Value of Mahatma Basaveshwara, pp. 10-16.
4. शेटकर (2022), २१ व्या शतकात महात्मा बसवेश्वराच्या विचारांची प्रासंगीकता, पान नं. १४-१९.
5. Maheshkumar (2016), Basaveshwara as A Social Thinker, pp. 53-59.
6. Khutale (2017), Human Value of Mahatma Basaveshwara, pp. 41-53.